RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १२३(२)] सोमवार, ऑक्टोबर १, २०१८/आश्विन ९, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए ०९१८/प्र.क्र. २४२/ ईएक्ससी २.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (g) आणि (h१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये पुढील नियम करीत आहे :—

१. (१) या नियमांना नियम "मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०१८" असे संबोधण्यात यावे.

(२) या नियमांची अंमलबजावणी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ पासून करण्यात येईल.

२. मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे) च्या नियम २५ मधील उप-नियम (४) मध्ये खंड (d) नंतर, उपखंड (iv) मध्ये पुढील परंतुक समाविष्ट करण्यात यावा, जसे की,—

"परंतु असे की, अशी अनुज्ञप्ती, ज्या मध्ये हे नियम मुंबई विदेशी मद्य (सुधारणा) नियम, २०१८ लागू होण्याच्या दिवसापासुनचे तसेच त्या पूर्वीच्या जिल्हाधिकारी, आयुक्त किंवा राज्य शासन, जे लागू असेल ते, यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अर्जांचा समावेश नसेल, अशा अनुज्ञप्त्या अशा जागेवरती स्थलातंरित करता येतील ज्या प्रस्तावित जागेपासून १००० मीटर हवाई अंतरात दुसरी तत्सम अनुज्ञप्ती किंवा महाराष्ट्र देशी मद्य नियमावली, १९७३ अन्वये मंजूर करण्यात आलेली नमुना सीएल-३ अनुज्ञप्ती स्थित नसेल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सह सचिव.

**HOME DEPARTMENT**

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 1st October 2018

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. FLR 0918/CR-242/EXC-2.— Whereas, the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, should be brought into force at once, and, therefore, the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* and clauses (*g*) and (*h1*) of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows namely :◘

1. (1) These rules may be called the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2018.
   (2) These rules shall come into force with effect from 3rd October 2018.

2. In rule 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, in sub-rule (*4*), in clause (*d*), after sub-clause (*iv*), the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, the licenced shop, other than those whose application for shifting has been pending with the Collector, the Commissioner or, the State Government, as the case may be on or before the commencement of the Bombay Foreign Liquor (Amendment) Rules, 2018, shall be shifted to premises where no shops with a similar licence or a licence in Form CL-III as appended to the Maharashtra Country Liquor Rules, 1973, is situated within the aerial distance of 1,000 meters from the proposed premises."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.